# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. ०८ जानेवारी २०२३

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १६/२०२३ भादंविसक १४३,१८६,१८८, मपोकाक १३५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०६/०१/२०२३ रोजी १२.०० वा ते २०.४५ वा चे दरम्यान, सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथील पोस्ट मार्टेम रुम समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०१/२०२३ रोजी ००.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/ १९३४ नितेश रमेश काळे, नेम- सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रहार संघटनेचे संपर्क प्रमुख जमीर शेख, २) कार्याध्यक्ष- खालीद मणीयार, ३) रेश्मा मुल्ला, ४) आकिब नाईकवाडी, ५) इब्राहिम जमादार, सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी मिळुन एमआयडीसी पोलीस ठाणे येथील अकस्मात मयत मधील मुलगी नामे- कु. ऐमन बंदेनवाज बिराजदार, वय- ७ वर्षे, हिस विजेचा शॉक लागुन मयत झाल्याने तिचे प्रेत शवविच्छेदन केले नंतर पुढील अंतविधी करीता तिचे पालकांना ताब्यात देत असताना, नमुद आंदोलन कर्त्यांनी विनापरवाना बेकायदेशीर जमाव जमवून मपोकाक ३७(१)(३) चा भंग करुन महापालिका येथील स्ट्रीट लाईटचे दुरुस्तीचे काम पाहणारे ई ई एस एल कंपनी मुंबई चे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर गुन्हा दाखल करा व पालकांना नुकसान भरपाई आताच दया असे म्हणून आंदोलन करुन, त्याठिकाणी सरकारी काम करण्यासाठी येणारे डॉक्टर व कर्मचारी यांना काम करण्याकरीता अटकाव केला आहे म्हणून. तपास:- मपोना/ १४१२ वाघमोडे- ७५१७५१७०२७ |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १४/२०२३ भादंविसक ३४१,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/०१/२०२३ रोजी ११.०० वा चे सुमारास, स्वराज हॉटेलचे जवळ, केगाव, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०१/२०२३ रोजी १९.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरेंद्र बसवराज शिरकोळी, वय- ३९ वर्षे रा. ४०१, कृष्णा टॉवर, दर्बी हाऊसचे पाठीमागे, पंखा विहीरीचे जवळ, रेल्वे लाईन, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) तुळशीदास लक्ष्मण शिंदे, २) अक्षय अनिल गुंड, ३) शेषबाई विजय दळवे, सर्व रा. केगाव, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे चारचाकी वाहन क्रं. एम एच १३ सी यु ०५८५ हा छोटा हत्ती पिक अप वाहन केगाव येथील फिर्यादीचे मालकीचे शेतात घेवून जात असताना, वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस अडवून, शिवीगाळ करुन धमकी दिली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११८६ घुगे- ७५०७४४४२२२ |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०४/०१/२०२३ रोजी ०८.३० वा ते १८.०० वा चे दरम्यान, सिध्देश्वर साखर कारखाना चे कुंभारी मेन गेट समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०१/२०२३ रोजी २०.०५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विश्वनाथ नागेंद्रप्पा जाधव, वय- ३२ वर्षे, रा. सध्या- गिरीजा मंगलकार्यालय शेजारी, जगदंबा चौक, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ६०,०००/- रु एक बजाज कंपनीची पल्सर एन एस १६० मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच ४२ ए डब्ल्यु ८५३५ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन सिध्देश्वर साखर कारखानाचे कुंभारी रोड मेन गेट समोर पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने, हॅन्डल लॉक तोडुन अगर डयुप्लीकेट चावीचा वापर करुन चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२६६ भांगे - ९९२३८८८०६१ |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०१/२०२३ भादंविसक ४२०,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | सन २०१९ रोजी ते आजतागायत, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०१/२०२३ रोजी २३.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रविराज सुर्यकांत कदम, वय- ३८ वर्षे, व्यवसाय- जेसीबी मशीन भाडयाने देणे, रा. मु.पो. देगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) बजरंग ऊर्फ दिपक बन्सीसिंग लंगडेवाले(मयत), रा. कुमठा नाका, सोलापूर, २) जितेंद्र बंसी नाईकवाडे, ३) सुजित नाईकवाडे, दोघे रा. कुमठे गाव, ता. उत्तर सोलापूर |
| **फसवणुक रक्कम** | : | १,०६,९५,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी संगनमत करुन, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास आर्थिक महामंडळ कडुन अडीच कोटी रुपये व नमुद चमडा व्यापारी यांचे कडुन उदयोग धंदयासाठी लोनच्या स्वरुपात दहा ते बारा करोड रुपये मिळवुन देतो म्हणून फिर्यादी कडुन १९,५०,०००/- रु व फिर्यादीचा भाऊ विजय कदम यांचे कडुन दहा करोड रुपये नमुद प्रमाणे लोन देण्यासाठी १५,१०,०००/- रु तसेच फिर्यादीचा मित्र गणेश होटकर यास साडेतीन कोटीचे लोन मिळवून देतो असे सांगुन ३,५०,०००/- रु घेवून फिर्यादी, फिर्यादीचा भाऊ विजय व मित्र गणेश यांची फसवणुक केली आहे. तसेच फिर्यादीस तुम्ही आमचे विरुध्द कोठे तक्रार केल्यास तुमच्या विरुध्द ॲट्रॉसिटी कायद्याप्रमाणे पोलीस स्टेशनला तक्रार देतो अशी धमकी यातील आरोपीत क्रं. २ व ३ यांनी दिली आहे. तसेच फिर्यादी प्रमाणेच आणखीन इतर लोकांकडुन देखील रक्कम घेवून एकुण १,०६,९५,०००/- रुपये इतकी रक्कम यातील वरील आरोपीतांनी स्विकारुन त्यांची देखील फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- पोसई/ मंद्रुपकर - ९६५७७९४००३ |